नि.फौ.ख.नं.४३/२०१७

**निशाणी क्र.४५**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

**माझे नाव - सुमन महादेव निंबाळकर,**

वय - ५५ वर्षे, व्यवसाय – शेती

रा. लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एम.डी.करे यांच्यामार्फत शपथेवर सुरु -</u>**

**१.** फिर्यादी माझा मुलगा आहे. आरोपी आमच्या घराच्या पाठीमागे राहत असल्याने मी त्यांना ओळखते.

**२.** घटना साधारण ८-९ वर्षापुर्वी घडली. घटना सकाळी आठ वाजता कॅनॉलच्या पुलाजवळ आमच्या रानात झाली. माझ्या पतीने रानात पाणी जाण्यासाठी दारे मोडले होते. त्या कारणावरुन आरोपी व माझ्या पतीचे भांडण लागले. आरोपींनी माझ्या पतीस लाथाबुक्क्यांनी मारले. मी व मुलगा तेथे पळत गेलो. आरोपी दत्तात्रय यांनी काठी माझ्या मुलाला हाणली. ती काठी माझ्या मुलाच्या उजव्या हाताच्या पंजावर मारली. आरोपींनी मला हाणमार केली. माझे डोरले तोडले. आम्ही आधी पोलिस ठाण्यात गेलो. त्यानंतर बावडा येथील सरकारी दवाखान्यात गेलो. माझ्या मुलाने इंदापूर पोलिस ठाणेत केस दाखल केली. पोलिसांनी घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली. ज्या काठीने माझ्या मुलाला मारहाण केली ती काठी मला दाखविल्यास मी ओळखू शकते. (साक्षीदारास वस्तु-अ वरील काठी दाखविली) ही काठी तीच आहे. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. आर.व्ही. शितोळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु -</u>**

**३.** मला लाखेवाडी येथील माझ्या जमीनीचा गट नंबर सांगता येणार नाही. हे खरे की आमच्या घराच्या पश्चिमेला आरोपी क्र.१ व २ चे घर आहे. माझ्या घरापासुन आमची शेती अर्धा किमी अंतरावर आहे. हे खरे नाही की, आरोपी क्र.४ चे घर माझ्या घरापासुन ४-५ किमी अंतरावर आहे. आरोपी क्र.४ चे घर माझ्या घरापासुन दोन कासरा अंतरावर आहे. हे खरे नाही की, आरोपी क्र.४ हा निरा-भिमा सहकारी साखर कारखाना येथे नोकरीस आहे. हे खरे नाही की, त्यामुळे आरोपी क्र.४ कथित घटनेवेळी घटनास्थळी नव्हता. हे खरे नाही की, आरोपी क्र.३ कडे माल वाहतुक करण्यासाठी टमटम

आहे. हे खरे नाही की, त्या टमटमने तो भाडे करतो. हे खरे नाही की, कथित घटनेवेळी आरोपी क्र.३ भाडे घेऊन गेला होता. हे खरे नाही की, आरोपी क्र.२ चा दुधाचा व्यवसाय आहे. हे खरे नाही की, कथित घटनेवेळी आरोपी क्र.२ दुध घालायला गेला होता. हे खरे नाही की, लाखेवाडी ते वस्ती हे अंतर ३ किमी आहे. हे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा अपंग आहे. हे खरे नाही की, आरोपी क्र.१ ला काठीचा आधार घेऊन चालावे लागते.

४. हे खरे की आरोपी व आमच्या शेतीत बांध आहे. तो उत्तर-दक्षिण आहे की कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, आम्ही शेतीची मशागत करताना तो बांध फोडला होता. त्यामुळे आमच्याविरुद्ध पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, आरोपींनी आमच्याविरुद्ध न्यायालयात तक्रार दाखल केली. हे खरे नाही की, आरोपी व आमचा पुर्वीपासुन वाद होता. हे खरे नाही की, त्या रागापोटी खोटी केस केली.

५. आमच्या घरापासुन हजार फुट अंतरावर दक्षिणोत्तर कॅनॉल आहे की कसे ते मला माहिती नाही. तो कॅनॉल पुढे पिटेवाडी येथे जातो अगर कसे मला माहिती नाही. त्या कॅनॉलला मोरी असुन तेथुन पाणी आमच्या रानात जाते अगर कसे मला माहिती नाही. हे खरे की, कॅनॉलच्या दक्षिणेला नाईकांची घरे आहेत. हे खरे की, त्या कॅनॉलवर पुल आहे. हे खरे की, त्या पुलावरुन सराटी ते लाखेवाडी असा रस्ता जातो. हे खरे नाही की, कथित घटनेवेळी तेथे कच्चा रस्ता होता. कॅनॉलच्या जवळचा रस्ता कच्चा असुन तेथे दगड माती आहे अगर कसे मला माहिती नाही. हे खरे की, त्या रस्त्याला लागुन कुंभार यांची घरे आहेत. हे खरे की, कॅनॉलच्या पुर्वेस पानसरे यांची घरे आहेत. हे खरे की, सराटी ते लाखेवाडी रस्त्याला लागुन पाण्याचा पाट आहे. हे खरे की, त्या पाटानेच आरोपी व आमच्या शेतीत पाणी जाते. हे खरे नाही की, आधी आरोपीची शेती भिजते व नंतर आमची शेती भिजते. हे खरे नाही की, कॅनॉलच्या शेजारी दलदल असते. हे खरे नाही की, कथित घटनेवेळी मी, माझे पती व मुलगा ट्रिपल सीट मोटारसायकलवरुन चाललो होतो. हे खरे नाही की, आम्ही मोटारसायकलवरुन पडल्याने आम्हाला दुखापती झाल्या.

६. तथाकथित घटनास्थळापासुन पोलिस स्टेशन किती अंतरावर आहे ते मला सांगता येणार नाही. हे खरे की, कथित घटनास्थळापासुन पोलिस स्टेशनला जायला १५-२० मिनीटे लागतात. पोलिस स्टेशनला माझा जबाब किती तारखेला घेतला मला सांगता येणार नाही. हे खरे की, जबाबातील माहिती माझ्या मुलाने पोलिसांना सांगितली. माझ्या जबाबातील माहिती मला माहिती नाही. हे खरे नाही की, वस्तु-अ वरील काठी बाजारात कोठेही उपलब्ध होते. वस्तु-अ वरील काठीवर ओळखीची विशिष्ट

खुण नाही. हे खरे नाही की, वस्तु-अ वरील काठी माझ्या मुलाने पोलिसांना दिली. हे खरे नाही की, आरोपी व आमचा शेतीचा वाद असल्याने, आरोपींनी आमच्याविरुद्ध तक्रार दाखल केल्याने मी खोटी केस दाखल केली. हे खरे नाही की, माझ्या सरतपासात कथन केलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.03.24 18:14:56 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**

**दि.२४/०३/२०२५**

नि.फौ.ख.नं.४३/२०१७

**निशाणी क्र.४६**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव - महादेव शंकर निंबाळकर,**

वय - ७५ वर्षे, व्यवसाय – शेती

रा. लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एम.डी.करे यांच्यामार्फत शपथेवर सुरु -</u>**

**१.** आरोपी आमच्या गावातील असल्याने मी त्यांना ओळखतो.

**२.** घटना दि.१२/०८/२०१६ रोजी सकाळी आठ वाजता घडली. मी कॅनॉलचे दारे मोडत असताना आरोपी तेथे शिवीगाळ करत आले. आरोपी मला मारहाण करीत असताना माझी पत्नी सुमन व मुलगा शिवाजी तेथे आले. आरोपी दत्तात्रय यांनी माझ्या मुलाच्या उजव्या हाताच्या पंजावर काठी मारली. आरोपींनी मला, माझ्या पत्नीला व मुलाला शिवीगाळ व मारहाण केली. माझ्या पत्नीचे मंगळसुत्र तोडले. तेथे जमलेल्या माणसांनी सोडवासोडव केली. आम्ही आधी बावडा पोलिस ठाण्यात गेलो. त्यानंतर बावडा येथील सरकारी दवाखान्यात गेलो. माझ्या मुलाच्या उजव्या हाताचा पंजा फ्रॅक्चर होता. आम्ही उपचार घेऊन इंदापूर पोलिस ठाणेत आलो. माझ्या मुलाने इंदापूर पोलिस ठाणेत केस दाखल केली. ज्या काठीने माझ्या मुलाला मारहाण केली ती काठी मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. (साक्षीदारास वस्तु-अ वरील काठी दाखविली) ही काठी तीच आहे. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. आरोपी शिवलाल हजर नाही. त्याला पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. आर.व्ही. शितोळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु -</u>**

**३.** हे खरे की, माझ्या घराच्या पश्चिमेला आरोपींचे घर आहे. तुमच्या घरापासुन तुमची शेती २००० फुट अंतरावर आहे या प्रश्नाला साक्षीदाराने शेती जवळच आहे असे उत्तर दिले. माझ्या जमीनीचा गट नं.३२६ आहे. आरोपींच्या जमीनीचा गट नंबर मला माहिती नाही. हे खरे नाही की, आरोपी क्र.४ ची शेती आमच्या शेतीलगत नाही. हे खरे नाही की, आमच्या घरापासुन आरोपी क्र.४ चे घर ५-६ किमी अंतरावर आहे. ते घर किती किमी अंतरावर आहे ते मला सांगता येणार नाही. आमच्या घरापासुन कॅनॉलचे अंतर १००० फुट आहे अगर कसे मला माहिती नाही. आरोपी सदाशिव हा निरा-

भिमा सहकारी साखर कारखान्यात नोकरीस आहे अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, त्यामुळे आरोपी क्र.४ कथित घटनेवेळी घटनास्थळी नव्हता. हे खरे की, आरोपी क्र.१ हा अपंग आहे. हे खरे नाही की, त्याला जोरात चालता व पळता येत नाही. हे खरे नाही की, आरोपी क्र.१ ला काठीचा आधार घेऊन चालावे लागते. हे खरे की, आरोपी क्र.३ कडे माल वाहतुक करण्यासाठी वाहन आहे. हे खरे नाही की,आरोपी क्र.३ भाडयाचा व्यवसाय करतो. हे खरे नाही की, कथित घटनेवेळी आरोपी क्र.३ तेथे नव्हता. हे खरे की, आरोपी क्र.२ चा दुधाचा व्यवसाय आहे. हे खरे की, त्यामुळे तो सकाठी आठ वाजता दुध घालायला जातो. हे खरे नाही की, कथित घटनेवेळी आरोपी क्र.२ आठ वाजता दुध घालायला गेला होता.

**४.** हे खरे की, आमच्या जमीनीच्या पुर्वेस आरोपी क्र.१ व २ ची शेती आहे.हे खरे की, आमच्या जमिनीत उत्तर दक्षिण असा बांध आहे. हे खरे नाही की, तो बांध मी फोडला होता. हे खरे नाही की, त्यामुळे आमच्याविरुद्ध आरोपींनी पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. हे खरे नाही की, आरोपींनी आमच्याविरुद्ध न्यायालयात तक्रार दाखल केली. हे खरे नाही की, माझ्या मनात त्याचा राग होता.

**५.** हे खरे की, दक्षिणोत्तर कॅनॉल पुढे पिटेवाडी येथे जातो. हे खरे की, कॅनॉलच्या दक्षिणेला नाईकांची घरे आहेत. हे खरे की, त्या कॅनॉलवर पुल आहे. हे खरे की, त्या पुलावरुन पुर्व-पश्चिम असा सराटी ते लाखेवाडी रस्ता जातो. हे खरे की, कथित घटनेवेळी तो रस्ता कच्चा होता. हे खरे की, कॅनॉलच्या जवळचा रस्ता कच्चा आहे. हे खरे की, त्या रस्त्याला लागुन कुंभार यांची घरे आहेत. हे खरे की, पुर्वेस पानसरे यांची घरे आहेत. हे खरे की, सराटी ते लाखेवाडी रस्त्याला लागुन पाण्याचा पाट आहे. हे खरे की, त्या पाटानेच आरोपी व आमच्या शेतीत पाणी जाते. हे खरे की, आधी आरोपीची शेती भिजते व नंतर आमची शेती भिजते. कॅनॉलच्या शेजारी दलदल असते अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, कथित घटनेवेळी मी, माझी पत्नी व मुलगा ट्रिपल सीट मोटारसायकलवरुन चाललो होतो. हे खरे नाही की, आम्ही मोटारसायकलवरुन पडल्याने आम्हाला दुखापती झाल्या. हे खरे नाही की, त्याचा गैरफायदा घेऊन मी खोटी केस केली.

**६.** तथाकथित घटनास्थळापासुन पोलिस स्टेशन ५-६ किमी अंतरावर आहे.कथित घटनास्थळापासुन पोलिस स्टेशनला जायला किती वेळ लागतो मला सांगता येणार नाही. पोलिसांनी माझा जबाब १२/०८/२०१६ रोजी नोंदविला. हे खरे नाही की, जबाबातील माहिती माझ्या मुलाने पोलिसांना सांगितली. हे खरे नाही की, वस्तु-अ वरील काठी बाजारात कोठेही उपलब्ध होते. वस्तु-अ वरील काठीवर ओळखीची विशिष्ट खुण नाही. हे खरे नाही की, वस्तु-अ वरील काठी माझ्या मुलाने

पोलिसांना दिली. हे खरे नाही की, आरोपी व आमचा शेतीचा वाद असल्याने, आरोपींनी आमच्याविरुद्ध तक्रार दाखल केल्याने मी खोटी केस दाखल केली. हे खरे नाही की, माझ्या सरतपासात कथन केलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.03.24 18:17:22 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**

**दि.२४/०३/२०२५**